सकाळ

# आळे महाविद्यालयाचा सायबर क्लबमध्ये सहभाग

**आळेफाटा, ता. ४ :** आळे (ता. जुन्नर) ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळ संचलित बाळासाहेब जाधव महाविद्यालयातील क्लब ऑफिसर्स व विद्यार्थी प्रतिनिधी यांनी पुण्यातील सर परशुरामभाऊ महाविद्यालयात क्विक हिल फाउंडेशनच्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा २०२४-२५ या अभियानात सहभाग घेतला. निवड करण्यात आलेल्या पुणे विभागातील सात महाविद्यालयांचे क्लब ऑफिसर्स, विद्यार्थी प्रतिनिधी, प्राचार्य व शिक्षक प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत सायबर वॉरिअर्स क्लबचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी बी.जे. महाविद्यालयातील सर्व क्लब ऑफिसर्स, विद्यार्थी प्रतिनिधींचा सत्कार क्विक हिल फाउंडेशनचे चेअरमन अनुपमा काटकर



**पुणे :** सायबर वॉरियर्स क्लबमध्ये सहभागी झालेले बी.जे.महाविद्यालयाचे विद्यार्थी

यांच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये विद्यालयाच्या संगणकशास्त्र विभागातील अक्षदा हाडवळे (क्लब प्रेसिडेंट), मिसबा इनामदार (क्लब सेक्रेटरी), वरद वाघ (कम्युनिटी डायरेक्टर), रोहन टाकळकर (पी.आर. मीडिया डायरेक्टर) व निवड झालेल्या इतर २६ विद्यार्थी प्रतिनिधींचा समावेश आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रवीण जाधव यांना क्विक हिल फाउंडेशनच्या प्रकल्पातील सहभागाबद्दल अधिकृतता प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

क्विक हिल फाउंडेशनचे सहसंचालक अजय शिर्के यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गायत्री केसकर(एक्झिक्युटिव्ह सीएसआर) यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले व विद्यार्थ्यांना अभियानात सहभागी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या. निवड झालेल्या विद्यार्थ्यांसोबत कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. जाधव, विभाग प्रमुख प्रा. नूतन जोशी व प्रा. दर्शना सहाणे उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष अजय कुऱ्हाडे, बाळासाहेब जाधव, उपाध्यक्ष सौरभ डोके, मानद सचिव अर्जुन पाडेकर, खजिनदार अरुण हुलवळे तसेच संचालक किशोर कुऱ्हाडे, भाऊ कुऱ्हाडे, बबन सहाणे, उल्हास सहाणे, बाबु कुऱ्हाडे, शिवाजी गुंजाळ, जीवन शिंदे, दिनेश सहाणे, कैलास शेळके, प्रदीप गुंजाळ, देविदास पाडेकर, सम्राट कुऱ्हाडे, रमेश कुऱ्हाडे, शांताराम कुऱ्हाडे आदी मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.